समरी केस क्रं.२७५/२०१६
सरकार वि.संजय
निशाणी क्रं.२०

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.- ०३**

| | | |
|---|---|---|
| साक्षीदाराचे नाव | - | चंद्रकला मधुकर मुन |
| वय | - | ६० वर्ष |
| धंदा | - | निरंक |
| राहणार | - | वार्ड नं.६, बेला, तह.उमरेड, जि.नागपुर |

## सरतपासणी सरकारतर्फे ॲड. श्री. बारस्कर

१. आरोपी संजय मुन हा माझा मुलगा आहे. आरोपी हा बेला येथील रहिवासी असुन तो सध्या जेलमध्ये शिक्षा भोगत आहे. आरोपीला वैशाली नावाची पत्नी आहे. तिला प्रियंका व रूचिका अशा दोन मुली आहेत. आरोपी हा प्रियंका हिच्या लग्नानिमीत्ताने बेला येथे आला होता. आरोपी हा जेलमधुन पॅरोलवर सुटीवर आला होता. तो नंतर कधी परत गेला हे मला माहिती नाही. या व्यतिरीक्त मला काही माहिती नाही.

(सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरून साक्षीदाराला भारतीय पुरावा कायद्याच्या कलम १५४ नुसार उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली आहे.)

## उलट तपासणी सरकारी वकीलांतर्फे -

हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा सन २०१४ मध्ये त्याची मुलगी प्रियंका हिच्या लग्नाकरीता बेला येथे आला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला त्यावेळी १७ दिवसाची रजा मंजुर झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा १७ दिवसांच्या वर घरी राहिला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा परत जेलमध्ये गेला की नाही याबाबत मला माहिती नाही. हे मला माहिती नाही की, तो मुदतीच्या आतमध्ये जेलमध्ये गेला नसल्यामुळे त्याच्याविरूध्द पोलिस स्टेशन बेला येथे केस दाखल करण्यात

आली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलिस स्टेशन बेला येथे बोलविण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझे बयान नोंदवुन घेतले होते. माझे बयानातील लिहीलेला मजकुर की आरोपी हा जेलमध्ये मुदतीच्या आत हजर झाला नाही हा खोटा असुन तो माझे बयानामध्ये का लिहीण्यात आला याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझा मुलगा असल्यामुळे मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट-तपासणी आरोपीतर्फे - आरोपी स्वतः</u>**

२. आरोपीने उलटतपास घेण्याचे नाकारले.

फेरतपास काही नाही.

वा. दा. ब. अ. क. केले — माझे समक्ष

**(ए.व्ही.पंडीत)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी उमरेड
दि.३०.०५.२०१७

**(ए.व्ही.पंडीत)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी उमरेड
दि.३०.०५.२०१७.